**ठळक बातम्या**

- विकसित भारत २०४७ पूर्वीच देश सिकलसेल ॲनिमियाचं पूर्णपणे निर्मूलन करेल, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत २ हजार ४०० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन निधीचं वितरण आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार

- नागपूरजवळ अंबाझरी इथं दहा हजार टनाच्या ॲल्युमिनियम एक्सट्रुजन प्रेसची संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते पायाभरणी

**आणि**

- विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेस्टच्या कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरु

**<><><><><>**

विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय उद्दिष्टापूर्वीच देश सिकलसेल ॲनिमिया या आजाराचं पूर्णपणे निर्मूलन करेल, असं प्रतिपादन  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज मध्य प्रदेशात ओंकारेश्वर इथे आंतरराष्ट्रीय सिकलसेल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. आदिवासी समुदायांमध्ये या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांचं आवाहनही राष्ट्रपतींनी यावेळी केलं. यानंतर त्या ओडिशातील रायरंगपूर इथे विविध विकासकामांचं उद्घाटन करणार आहेत. यात एम्स भुवनेश्वर आयोजित वैद्यकीय शिबिर, खाणकामबाधित गावांसाठी नळाने पाणी पुरवठा करणारी योजना आणि एका विशेष सर्किट हाऊसचा समावेश आहे.

दौऱ्याच्या पुढच्या टप्प्यात, राष्ट्रपती मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २० जून रोजी ओडिशात मयूरभंज जिल्ह्यातील पहाडपूर गावाला भेट देतील. २१ जून रोजी, राष्ट्रपती जबलपूर येथील 'आंतरराष्ट्रीय योग दिन' सोहळ्यात सहभागी होतील आणि राणी दुर्गावती विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील. २२ जून रोजी त्या कुनो राष्ट्रीय उद्यानाला भेट देतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत २ हजार ४०० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन निधीचं वितरण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. देशभरात २०० ठिकाणी, प्रामुख्यानं औद्योगिक आणि रोजगार केंद्र असलेल्या भागात हा कार्यक्रम होणार आहे. प्रथमच नोकरीवर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन देणं आणि संबंधित कर्मचाऱ्यांना रोजगार देणाऱ्या औद्योगिक संस्थांनाही प्रोत्साहनपर अनुदान देणं, अशा दोन भागात ही योजना राबवली जाणार आहे. गेल्या वर्षी ऑगस्टपासून या योजनेअंतर्गत ६३ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना औपचारिक रोजगार क्षेत्रात आणलं गेलं असून, त्यापैकी जवळपास ३० टक्के महिला असल्याचं, कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी सांगितलं. छत्रपती संभाजीनगर इथं महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या सभागृहात या कार्यक्रमाच्या प्रसारणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री किसान सन्माननिधी योजनेचा २३व्या हप्त्याचं वितरण उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पश्चिम बंगालमध्ये हुगळी जिल्ह्यातल्या तारकेश्वर इथून करणार आहेत. या हप्त्यानंतर, फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरू झालेल्या पीएम किसान योजनेतून शेतकऱ्यांना मिळालेल्या रक्कमेचा आकडा ४ कोटी ४६ लाखांचा टप्पा ओलांडेल.

पश्चिम बंगालमध्ये शेतीसंबंधी अनेक योजनांचा आरंभही उद्या प्रधानमंत्री करणार आहेत. यामध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजना, पुनर्रचित हवामान आधारित पीक विमा योजना यांचा समावेश आहे. डिजिटल कृषी अंतर्गत ॲग्री स्टेक या योजनेचाही उद्या ते आरंभ करतील.

पुरुलिया, दार्जीलिंग, अलीपुरद्वार आणि झारग्राम या जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेचा आरंभही मोदी करणार आहेत. या निमित्ताने देशभरात पीएम किसान उत्सव दिवस हा विशेष कार्यक्रम होत आहे. या कार्यक्रमाला देशभरातून एक कोटी शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित राहतील असं कृषी मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

देशाचं संरक्षण उत्पादन मागील वर्षात विक्रमी १ लाख ७८ हजार कोटी रुपयांहून अधिक झालं तर देशांतर्गत उत्पादनामुळे संरक्षण क्षेत्रातली निर्यात ४० हजार कोटी रुपयांवर पोहोचली असल्याचं, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज नागपूरजवळ अंबाझरी इथल्या शस्त्र कारखान्यात दहा हजार टनाच्या

ॲल्युमिनियम एक्सट्रुजन प्रेस या यंत्राची पायाभरणी करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. या प्रकल्पात तयार होणारे सुटे भाग केवळ शस्त्रास्त्रांमध्येच नव्हे तर रेल्वे , इस्रो, डीआरडीओ यासारख्या संस्थांच्या यंत्रसामग्रीत देखील वापरले जातील, असंही त्यांनी सांगितलं. ही कंपनी सध्या मिनी रत्न श्रेणीमध्ये असून लवकरच ही कंपनी महारत्नचा दर्जा मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे ॲल्युमिनियम एक्सट्रूडेड घटकांच्या आयातीवरील देशाचं अवलंबित्व कमी होऊन आत्मनिर्भर भारत संकल्पनेअंतर्गत स्वदेशी उत्पादनाला पाठबळ मिळणार आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या प्रकल्पामुळे नागपूर सह विदर्भातल्या संरक्षण निर्मिती परिसंस्थेला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**होल्ड... बाईट - मुख्यमंत्री**

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी केंद्राच्या सूक्ष्मजीवशास्त्रीय चाचणी प्रयोगशाळेचं उद्घाटन आज मुंबईत केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते झालं. याठिकाणी बहुमजली निवासी संकुलाच्या प्रकल्पाचं भूमिपूजनही त्यांनी केलं. छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सॅटेलाईट केंद्राचं आणि गाझियाबाद इथल्या राष्ट्रीय चाचणी केंद्रातल्या बूट चाचणी सुविधेचं दूरस्थ पद्धतीने त्यांनी उद्घाटन केलं. जागतिक परिस्थिती अस्थिर आणि जागतिक व्यवस्था कमकुवत झालेली असताना, गुणवत्तेची खात्री देऊन भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्यात या चाचणी सुविधा महत्त्वाची भूमिका बजावतील, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

मुंबईची परिवहन सेवा असलेल्या बेस्टच्या कर्मचाऱ्यांनी आज सकाळपासून बेमुदत संप सुरु केला आहे. मुंबई महानगर पालिकेच्या अर्थसंकल्पात बेस्ट च्या अर्थसंकल्प सामावून घ्यावा. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित आर्थिक लाभ तातडीनं देण्यात यावेत. सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी आदी मागण्यांसाठी बारा कर्मचारी संघटनाच्या वतीनं हा संप पुकारण्यात आला आहे. या संपामुळे मुंबईतल्या २७ बेस्ट डेपोमधून एकही बस बाहेर पडली नाही. या संपामुळे सकाळी आपापल्या कार्यालयाकडे निघालेल्या लाखो प्रवाशांना त्रास सहन

करावा लागला. बेस्टच्या संपामुळे टॅक्सी, रिक्षा आणि इतर वाहनांचा आधार घ्यावा लागला. बेस्ट संपामुळे मुंबईच्या मेट्रो सेवांवरही मोठा ताण आल्याचं दिसून आलं. बेस्ट उपक्रमाच्या २ हजार ७६६ बसेस पैकी केवळ ३८ बसेस रस्त्यावर धावत असून सहा ठिकाणी कामगारांनी बसेस वर दगडफेक केल्यामुळे बसेसचे नुकसान झाल्याची माहिती बेस्ट प्रशासनाने दिली आहे. संपाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी बेस्ट मालमत्तेचं नुकसान आणि वाहतुकीत व्यत्यय आणणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

<><><><><>

सलग पाच सत्रात तेजी नोंदवल्यानंतर देशातल्या शेअर बाजारात आज घसरण दिसून येतेय. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागात झालेल्या घसरणीमुळंही शेअर बाजारात घसरण दिसून येतेय. सध्या सेन्सेक्स ७०० हून अधिक अंकांनी घसरला असून ७६ हजार ६५० अंकांच्या आसपास व्यवहार सुरू आहेत. निफ्टी सुमारे २०० अंकांनी घसरला असून २४ हजाराच्या आसपास व्यवहार सुरू आहेत.

<><><><><>

नीट यूजी फेरपरीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएनं एक अधिकृत व्हॉटसअप संपर्क वाहिनी सुरु केली आहे. परीक्षे संदर्भातली सर्व अधिकृत माहिती ७८२७९८०२८७ या व्हॉटसअप क्रमांकावर उपलब्ध करुन दिली जाणार आहे. आपल्या व्हॉट्सअप वर परीक्षेसंबंधी कोणताही संदेश आल्यास ब्लू व्हेरिफिकेशन टिक आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीचे नाव असल्याची खात्री करुन घ्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे. नीट यूजीची फेरपरीक्षा येत्या रविवारी होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी २१ जूनच्या परीक्षेसाठी आपलं हॉल तिकीट या आधी डाऊनलोड केलं आहे. त्यांना पून्हा ते डाऊनलोड करण्याची गरज नसल्याचंही चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. ३ मे रोजीच्या परीक्षेसाठीचं डाऊनलोड केललं हॉलतिकीट या परीक्षेला चालणार नसल्याचंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

//<><><><><>//